**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# नवं काटवन — एक शोकांतिका

**प्रा. सीमा सखाराम डोके**

दादा पाटील महाविद्यालय, कर्जत

ता. कर्जत, जि. अहमदनगर.४१४४०१

**प्रास्ताविक**

भारताला एक सांस्कृतिक वारसा आहे. या सांस्कृतिक वारसा स्त्री आणि पुरुष यांच्या परस्परपुरक सहसंबंधातून जतन झाला आहे. प्राचीन काळापासून स्त्री आणि पुरुष यांच्यातील सबंध लक्षात घेता कुटुंब, राजकारण, समाजकारण, साहित्य आणि संस्कृती या सर्वच पातळीवर तिला दुय्यमत्व प्राप्त झाले.

असे म्हणतात की, ही सृष्टी परमेश्वराने निर्माण केली म्हणून त्याने सर्व अधिकार स्वत:च्या हाती घेतले व स्त्रीच्या वाटयाला दुय्यमत्व आले. सर्व व्यवस्था या पुरुषप्रधान, पुरुषकेंद्रीत झाल्या. स्त्रीला मात्र परिघावरचे स्थान, कुटुंबातील कर्ता म्हणून प्रथम स्थान, अर्थ व्यवहार पुरुषांकडे, धर्मग्रंथ स्वत:च्या सोयीप्रमाणे, निर्णय घेण्याचे अधिकार पुरुषांकडे मुलींच्या लग्नाच्या तऱ्हादेखील ताराबाईंनी वर्णन करुन सांगितल्या आहेत. "लग्न ठरविण्याचे सर्व अधिकार कुटूंबात पुरुषांना असतात. मुलीच्या आईचाही विचार यामध्ये घेतला जात नाही. लग्नव्यवहारात अर्थव्यवहाराला केंद्रस्थान असे".[१] स्त्रियांच्या बाबतीत मात्र या सर्व बाबी दुर्लक्षित केल्या गेल्या. कारण पुरुष हा निर्माता कर्ता. या सर्व परंपरा स्त्री जातीस दु:ख देण्यास कारणीभूत ठरतात.

मुलगी परक्याचं धन म्हणून ती जन्मल्यावर आई-वडीलास घोर लागतो. मुलगी उपवर झाल्यावर तिचे कन्यादान करुन झाले की जबाबदारीतून मोकळे होतात. 'ईश्वरापुढे सर्व लेकरे समान', आई-वडिल ईश्वरासमान मग मुलीला सासरी दिल्यावर तिला जे बरे वाईट अनुभव येतात. त्या अनुभवाकडे पाहता मुलगी ही आई वडिलांकडे पाहून सहन करते, आई वडिलांचे नाव कमविण्यासाठी तिला संघर्ष करावा लागतो. "स्त्री म्हणून जी जडणघडण होते ती सामाजिक दृष्टिकोणातून आणि याची सुरुवात कुटुंबातूच होते. प्रख्यात स्त्रीवादी लेखिका 'सिमान-द-बोव्हा' यांनी म्हटल्याप्रमाणे, "कोणतहीही बाई बाई म्हणून जन्माला येत नाही तर समाजात तिची जडणघडण बाई म्हणून होत असते. हे बाईपण नैसर्गिक नसून समाजाने तिच्यावर लादलेले आहे."[२]

"पुरुषसत्ताक व्यवस्थेखाली ही स्त्री दबलेली असतेच, ती पुन्हा कुटुंबाच्या जातीच्या कुलाचाराच्या दडपणाखाली दाबली जाते. तिचा अधिकच कोंडमारा होतो. भोवतालच्या समाजाचे एक सततचे दडपण तिच्यावर असते."[३]

आजही जास्तीत जास्त संपत्तीवर अधिकार हा पुरुषांचा आहे. माहेरी वडील, भाऊ तर सासरी नवरा-सासरे यांच्या नावावर संपत्ती, शेती असते. कृषिसंस्कृतीची जनक असलेली सृजनशील स्त्रीची मात्र "सात-बारा" वर नोंद आढळत नाही. त्यामुळे तिला आर्थिक निर्णय घेता येत नाहीत. लहान गोष्टींसाठी तिला पतीपुढे हात पसरावे लागतात. दिवसभर घरात राबणाऱ्या गृहीणीच्या श्रमाचे अवमूल्य होते. ग्रामीण भागात घर संभाळून पुरुषांच्या बरोबरीने दिवसभर शेतात राबणारी स्त्री सुद्धा संपत्तीवर हक्क दाखवू शकत नाही.

परंतु कायदयाने समानतेचा हक्क बहाल केला असतानाही हा हक्क फक्त वंशाच्या वारसदारास मिळावा म्हणून अनेक प्रकारची पळवाट शोधली जाते. "पुरुषाच्या मनात मालकी हक्काची भावना एवढी तीव्र असते की, स्त्रीस तो माणूस म्हणून न समजता आपली संपत्ती म्हणून समजतो."[४]

"स्त्रियांचा पुरुषसत्ताक व्यवस्थेशी आणि याच व्यवस्थेत जडणघडण झालेल्या "स्व" शी भावनिक संघर्ष आहे."[५] या संघर्षात तिला आपल्याच घरातील व्यक्तीसमोर न्यायासाठी हक्कासाठी उभे रहावे लागते. "स्व" चा शोध घेताना "माणूस" म्हणून स्त्रीच्या अस्तित्वाचा तिच्या

आत्मशोधाचा शोध नव काटवन ही भीमराव वाघचौरे यांची कादंबरी घेते. मानवी मूल्याची प्रतिष्ठापना करणारे स्त्री भावविश्व या कादंबरीने उभे केले आहे.

**संशोधनाची गृहितके**

१. नवं काटवण मध्ये रूढी परंपरा, ग्रामीण संस्कृतीचे वर्णन येते.
२. स्त्री व्यक्तिरेखांच्या नातेसंबधावर भाष्य करताना व्यक्ति व्यमिश्रेतेचे दर्शन घडते.
३. नायिकेचा परिस्थितीशी होणा-या संघर्षाचे वर्णन दिसून येते.
४. तत्कालीन समकालीन व्यवस्थेवर भाष्य दिसून येते.
५. नायिकेचा "स्व" शी होणाऱ्या संघर्षातून जीवनविषयक व्यापक दृष्टीकोन दिसून येतो.

**सशोधनाची उद्दिष्टये**

1) कादंबरीच्या माध्यमातून तत्कालीन ग्राम संस्कृतीतील रूढी परंपरेचा शोध घेणे.
2) नायिका व इतर स्त्री व्यक्तिरेखा यांच्या भाविनिक सहसंबधाचा शोध घेणे.
3) कलाकृतीच्या माध्यमातून तथाकथित समाजावर व्यवस्थेच्या होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
4) नायिकेचा 'स्व' बरोबर परिस्थितीशी असणाऱ्या संघर्षाची नोंद घेणे.

**नव काटवनमधील जीवनसंघर्ष**

या कादंबरीची नायिका सुनिता या व्यक्तिरेखेभोवती ही कादंबरी फिरत आहे. लहान वयातच तिचे लग्न होते. सुनिता आपल्या भावी जोडीदारविषयी नवीन स्वप्ने घेऊन ती सासरचे माप ओलांडते.

एक दुकान तीन एकर जमीन ऐकून वडील जवळच्या नात्यात सुनिताचे लग्न लावतात. 'मुलगी म्हणजे तळहातावरचा विस्तू वेळीच झटकला तर बरं नाहीतर पोपडा घेऊन उठतो" (पृ.३०). मुलगी ही जबाबदारी वाटत नसून एक ओझं वाटते ही समाजाची मानसिकता अजूनही काही ठिकाणी पहायला मिळते. नवरा संदिप सोमवसे हा शिक्षणाची आवड नसलेला कामाची आवड नसलेला. वाटणी झाल्यावर थोरला भाऊ सोपानकडे तीन एकराच बरडं व संदिपकडे दुकानदारी येते. त्या चार पत्र्याच्या दुकानावरच त्याची काय ती भिस्त. अंगात दुकानदारी संचारली, दुकानात टवाळकी करणाऱ्या काही गिऱ्हाईकामुळे धंदयातील पकड सैल होते. किराणा सामानाच्या निमित्ताने त्याचे आठवडयाला चक्कर वाढतात. उधारी वाढते. शेठ खुश करण्याच्या निमित्ताने हॉटेल-बारचे त्याचे मुक्काम वाढतात. या असल्या उदयोगाने सुनिता कायम त्रस्त राहते. नवऱ्याच्या वागण्यामुळे तिला इतर लोकांपुढे माफी मागवी लागते, पदर पसरावा लागतो.

ज्याप्रमाणे मारक्या, उधळणाऱ्या जनावरांला थाऱ्यावर आणण्यासाठी जसं त्याच्या गळयात लोढणं बांधतात, त्याप्रमाणे सुनिताला संदिपच्या गळयात बांधल जातं आणि सुनिताची नवऱ्यासोबर फरफट सुरु होते. इकडे सुनिताच्या माहेरी दोन भावजयांत सतत भांडयाला भांड लागत असतं. घर फुटायला नको म्हणून नाना(वडील) सुनिताच्या तिसऱ्या हक्काची खोटी का होईना पण तोंडाची वाफ घालवून बसतात. "तरवटाच्या झाडाला मोहाळं सापडल्यावर कोण काढून घ्यायला मागेपुढे पाहिलं का!" (पृ. १७६). धनुष्यातून सुटलेला बाण आणि तोंडातून गेलेला शब्द कधीच माघारी येत नाही.

जागतिकीकरणानंतरही समकाळातील स्त्री हक्कांविषयी एक दु:खरे सामाजिक वास्तव प्रतिनिधिक स्वरुपात मांडले आहे. "प्रत्येक लेक जर बाप भावाच्या जमीन जुमल्यातून वाटा घेऊन त्यांच्या ऊरावर पाय देवून तिथे राहीली तर लोकाना हे मानवत नाही (जगाची) रीतच असते तशी," (पृ २६१). स्त्रीच्या अधिकारांविषयी समाज जीवनातील दु:खरे वास्तव उदासीनता ही कांदबरी अधोरेखित करते.

केसच्या निमित्ताने कोर्ट कचेऱ्याच्या निमित्ताने तिचा प्रवास सुरु होतो. कोरडगाववरुन जाणारी गाडी असायची दुपारनंतर कधी नावं पुकारल जाईल हे सांगता येत नव्हंत. याची चिंता लागायची. नाव पुकारल्यावर हजर नसल्यावर पुन्हा पुढची तारिख, पुन्हा हेलपाटा, पुन्हा वेगवेगळया कागदपत्रांची जमवाजमव, पुन्हा वकिलाची फी हे सर्व जेरीस आणणार होतं.

कधी कधी हे नको होतं. कोर्ट कचेऱ्या नको, खाऊ दयाव त्यांनाच कधी हारल्या सारखं वाटायचं काय करायचं त्या या इस्टेटीमुळे जन्मदात्या आई-बापाला डोळे भरुन पाहता येत नव्हतं. सुनिताची केस ही कासोपकर वकील यांच्याकडे असते. केसच्या निमित्ताने वागण्या बोलण्यातील सवयीमुळे पोटचा मुलगा राजू ही तिला सोडून जातो सुनिताने नवऱ्यामागे

ज्याच्यासाठी हा लढा उभारला तो कळीत मुलगा परदेशी निघून जातो. दीर, जाव, गणगोत सगळे ऐनवेळी हात वर करतात. ज्यांच्या हात डोक्यावर असायल पाहिजे ते दावेदार होतात.

केसचा निकाल सुनिताच्या बाजूने लागल्यानंतर कासोपकर वकील एकटया बाईकडे पाहून तोंड गोड करण्याची मागणी करत खडा टाकून पाहतात. यामधून पुरुषी मानसिकतेची, स्त्रीच्या एकटेपणाचे, वैधव्याचे दाहक जीवदर्शन होते. जिथे जाईल तेथे घालून पाडून बोलणे, लगट करणे यावर ती विद्रोह करुन उठते. आणि करारी पण बाणेदार उत्तर देते. “एक ध्यानात घ्या वकीलसाहेब आव जी बाई नवऱ्यामाघारी बाप भावाच्या विरोधात कमरेला पदर खोचून एकटी उभी राहते तिला तुमच्या सारख्या वकिलाला सरळ करणारे तुमचेच कितीकबी जातभाई भेटतील आजुनबी...! पण तुम्ही बाप भाऊ व्हऊन माही केस जितून दिली त्याच रिण माननारी बाईहे! म्हणून मी तसं करणार नै!”( पृ. ३२५).

एक बाई म्हणून ‘बाईपण’,‘आईपण’ जपत असताना काटवणातील प्रवास हा पावलोपावली रक्तबंबाळ करतो. ताब्याकब्जासाठीची लढाई अजून बाकी असते. ही लढाई तीला एकटीलाच लढाईची होती. यासाठी तिला दीर सोपान मदत करतो. परंतू तीन एकराच्या बरडावर सुनिताने अधिकार दाखवू नये म्हणून हा सारा खटाटोप यातून परुषी स्वार्थी वृत्तीचे दर्शन घडते.

केस ही बाप-इस्टटीच्या वाटयाची असते. आणि निकाल सुनिताच्या बाजूने लागला असला तरी ताब्या कब्जासाठी तिला प्रशासकीय दरबारात खेटे घालावे लागतात. ताब्या कब्जाचा संघर्ष सुरु होतो.

ताब्या-कब्जाचं काम जरी तहसीलचं असल तरी रव्हेव्यूचे अपरहेड कलेक्टर असतात. हे अधिकार फक्त कलेक्टरला असतात. म्हणून त्यासाठी करणे तहसील जमीनीच्या चतु:सीमाच निश्चित झाल्यावर मोजणी ऑफीसद्वारे चार हिस्से निश्चित होणार मग मंडळ अधिकाराला आर्डर, शेवटी तल्हाटयाला घेवून जायमोकयावर ताब्या कब्जाची कारवाई. या सर्व प्रोसिजर मधून सुनिताला जावे लागणार होतं.

यासाठी औरंगाबादला जाऊन कलेक्टरकडं अपील कराव लागणार. त्याच्यासाठी पुन्हा वकिलाचा शोध, शिवाय येण जाणं, भाड, हेलपाटे मारण हे सर्व ओघानेच आले. परंतु कोणाकडून कोणते काम कसं करुन घ्यायच याची हातोटी सुनिताकडे होती. कोर्ट कचेऱ्याच्या अनुवातून ती बरचं काही शिकली होती. आणि या “ताब्या कब्जाच्या भानगडीत हातातली सगळी पुजी संपली. दुकानातल्या शिल्कीपासून ते अंगावरचे स्त्रीधन सगळ, किडूक-मिडूक विकून दाव्या वकिलाचं मिटविले होते हातच सगळे जाऊन पळत्याच्या मागं जाव लागलं, दुकानाच्या जागेच्या भाडयावर, रोज वणवण करीत मिळविलेल्या रोजमजुरीवर तेवढयावर भागवाव लागत होत”( पृ.३३५). यावेळी तिची मैत्रीण छाया व छायाच्या ओळखीतले असणारे सावंत सर माणुसकीच्या नात्याने मदत करतात. जमिनीचा कब्जा मिळाल्यावर वादाची जमीन कसण्यास कोणी तयार होत नाही.

**नवं काटवण मधील स्त्री व्यक्तिरेखा**

कादंबरीत अनेक स्त्री व्यक्तिरेखा तिच्याभोवती आहेत. आई(मधुरा नानी) लेकीची पोट तिडकीने काळजी करते. मुलीच्या कपाळावरच कुंकू पुसण्याची गोष्ट पोटच्या मुलांकडून ऐकताच पेटून उठते. त्यांना शिव्या शाप देते. ‘बायकाच्या जातीसाठी नवरा हाच खरा देव असतो.’ आगं, आयबाप कव्हाच जल्माला जात नसत्यातं. जल्माला पुरतो फक्त तेवढाच एकजण म्हणून त्याल जप बाये. काय काळजी घ्यायची ती त्याची घे. तोच जल्माजुगाचा जोडीदार अस संसारिक, व्यवाहारीक तत्व सांगते.

सासू(तुळसा) कोर्टच्या फैसला झालयावर घरात अंधार दिसताच सुनिताच्या काळजीन चौकशी करते. सासू ही आईच्या जागी असते. लेकीप्रमाणे तीला जीव लावते. परभा(काकू)कोर्टाच्या कामाच्या वेळी थोरला दिर सोपानचा आधार घ्यायला सांगते “आगं ताणल्यान ताणतं आन तोडल्यानं तुटत जातं बये, माणूस लागतंच गं बाये बाईमाणसाच्या पाठीमाघे, ने त कायी खरं नसतं पाहाय एकटया – एकलपायी बाईंच” (पृ. ३२८). कोर्ट कचेरीच्या कामासाठी ती तल्हाटी आप्पाचा सल्ला घ्यायला लावते.

मामी – तोंडात गुळाचा खडा ठेवून ती मामीकडे येते पोटच्या मुलीसारखी माया करते. मायेच्या पोटी वडीलधारी कसं मर्यादा संभाळून बोलावं याच भान आणून देते. “भाचीन मामीच्या पाया पडायचं नसतं कव्हा कारण की, मामी पेक्षा भाची वयाने लहान असली तरी नात्याने मोठी राहाती म्हणूनच भाचीला आवं-जावं घालावं, लागत आणि चार बायकात

भाचीच्या पायाबी पडावं लागतं, हेच शास्तर जपत आलोय बाये आम्ही जुन्या बायका....”(पृ. ३४९).

आजही ग्रामीण भागातील परंपरेच रितीरिवाज वर्णन स्त्री व्यक्तिरेखांच्या माध्यमातून पहायला मिळते.

तारा – गिरजाच्या नजरेत सुनिता सुखा दु:खाला म्हणून तीच जवळची दोघा भावाच्या नंतरची, स्वभावाने रागीट, नणंद म्हणून जास्तंच तोऱ्यातली, गिरजा ताराच्या मनान ती आतल्या गाठीची होती. त्यांच्या शेरावर पाय देणारीची राखरांगोळीची शापवाणी असा नणंद-भावजयीचा हेवा एकात-एक मिसळून दोघीबी सुनिताचा द्वेष करत होत्या. वयाने लहान असली तरी तिचे पाण्याने पाय धुवायचे. तिला हळद-कुंकू लाऊन पदराने पाय पुसायचे. तिला हळद-कुंकू लाऊन पदाराने पाय पुशीत तिच्या पाया पडायचं.

छाया तशी गावातलीच सुनितापेक्षा दहा बारा वर्षाने मोठी, नवऱ्यान सोडून दिलेली, स्वभावाने अगदी मनमिळाऊ, अंगणवाडी शिक्षिका, बैठका मिटिंग, लोकांच्यात बसण्याउठण्यातून तिच्या विचारात बदल झालेला. छाया ही सुनिताची सावली आहे. जी प्रत्येक वेळेस तीला साथ देते.

सुनिता मधील सावंत सरांच्या बाबतीत असलेला बदल हा तिला जाणवला होता. सावंत सरांची आईची सुनितावरची असलेली माया, सावंत सरांचे मत जाणून घेऊन ती सुनिताला पदरात घेण्याची विनवणी करते. पुढाकार घेऊन एकनाथ आण्णाकडे जाऊन सुनिताच्या लग्नाबद्दलची बोलणी करते पक्की मनकवडी स्वभावाची छाया ही अगदी तिच्या नावाप्रमाणे तिच्यासोबत असते.

या कादंबरीतील अनेक स्त्री व्यक्तीरेखा आहे ज्या सुनिताच्या एकटेपणाविषयी तिच्या कोर्ट कचेऱ्याविषयी कुचेष्टेने बोलतात. जाऊ सरस्वती त्यातलीच गळयातील “दावं तुटल्या जनावराच्या नजरेने लोक एकटया बाईकडे पाहतात” (पृ. ४५२) परंतु; काही स्त्री व्यक्तिरेखा अतिशय समंजस त्या सुनिताच्या संघर्षास साथ देतात. वेळोवेळी मायेची फुंकर घालतात. अशा भाव-भावनांचे कित्येक पापुद्रे व त्यातून संघर्षाचे बीज अंकुर धरु पाहत होते.

**सुनिताची शोकांतिका**

छायाच्या पुढाकाराने सावंत सर व सुनिताच्या लग्नाची बोलणी एकनाथ अण्णांच्या मळयात बैठकीत झाली. शहाण्णव कुळात खानदानी कुलीन स्त्री जिचा डोक्यावरचा परद कधी हटला नाही, जी स्त्री नियमाच्या चौकटीत राहून कोणाचाही आधार नसताना कोणापुढेही लाचार झाली नाही. तिच्या बाबतीत काहीतरी चांगले घडत होते. जुन्या रितिरिवाजाला फाटा देत सुनिता व सावंत सरांच्या लग्नाला सहमती मिळाली. सायगावला मंगळवारी संकष्ट चर्तुर्थीच्या निमित्ताने रजिस्टर लग्नाची सहमती पक्की होते. सर्व भावकीचीही सहमती मिळते. थोरला भाऊ माणिकला ती आपली जमीन कसण्यासाठी देते. नाना नानीला संभाळण्याच आश्वासन घेते. शेषराव ने वाटया-हिस्स्यासाठी शेषरावावर केस टाकल्यावर त्यास मागे घेण्याची विनंती करते. ज्यामुळे वाटया हिस्याच्या निमित्ताने जे भोग तिच्या वाटयाला आले ते बिचारे तारा वहिणीच्या वाटयाला येवू नये. यातूनच सुनिताची एका बाई विषयी असलेली सु-नीती दिसून येते. एक बाईच बाईच दु:ख समजू शकते. यातून हे अधोरेखित होते. सावंत सरांमुळे पुढचे दिवस सोन्याचे होणार होते. अंगावरती हिरवा शालू लेवून मोरपंखी स्वप्नांचे रंग भरले. थोरा मोठयांचे आशीर्वाद घेऊन संसाराची सुखद मनोरे रचत पुढच्या प्रवासास तयार झाली आणि एकाएकी मृत्यूने घाला घालावा, रंग सारे विस्कटून जावे. स्वप्नांचे रचलेले मनोरे ढासळत जावे त्याचप्रमाणे सावंत सरांच निघून जाणं हे नियतिच्या मनात काही वेगळंच होत. नियतीपुढे तिने हात टेकले होते. सुखी संसाराचा सोनेरी रंग विरुन गेला होता.

**निष्कर्ष** –

1) ग्रामजीवनातील वास्तवाचे वर्णन आले आहे.
2) स्त्री मनाची अभिव्यकती, सामाजिक स्थान, शारीरीक व मानसिक घुसमटीचे वर्णन येथे आले आहे.
3) मानवी नाते संबंधातील भावभावनांचा संघर्ष, व्यवस्थेशी असणाऱ्या संघर्षाचे वर्णन येथे आले आहे.
4) ‘नवं काटवण’ मधील स्त्री रीतीरिवाज परंपरा, संस्कृती याद्वारे आपली नितीमूल्ये जोपासते.
5) नायिकेच्या संघर्षमय जीवनात ती आपले अस्तित्व जपताना दिसते.

**समारोप** –

भीमराव वाघचौरे यांची ‘नवं-काटवण’ या कादंबरीतील व्यक्तिरेखा ग्रामीण अंतरंगातील आहे. “स्त्रीवादी दृष्टीकोनाचा प्रभाव स्त्रियांच्या नव्हे तर पुरुषांच्या लेखनातही दिसू लागला आहे.”[१५] बोलीभाषा, मानवी भाव-

भावनांचा सहसंबंध प्रादेशिक भाषेचा प्रभाव कादंबरीवर पडला आहे. कादंबरी विश्वात स्त्री हक्क, आत्मसन्मान एक नाविन्यपूर्ण विषयाची मांडणी झालेली आहे. एक प्रयोगशील कादंबरी स्त्री प्रश्नांना मुखर करुन नवे भान समाजासमोर प्रतिनिधिक स्वरुपात उभे करताना एक नवीन आशावादी दृष्टिकोन तयार होवू शकतो.

**संदर्भसूची**

1) ताराबाई शिंदे – लिखित 'स्त्रीपुरुषतुलना', (यथामूल संशोधित आतृत्ती), 'संपादक विलास खोले', 'प्रतिमा प्रकाशन', द्वितीयावृत्ती, १ जून १९९९ (भारतीय स्वातंत्र्याचा सुर्वणमहोत्सवी दिन पृ. २२)
2) डॉ. वंदना महाजन', 'स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ४ एप्रिल २०११ गुडीपाडवा.पृ. २२
3) 'मोहन पाटील', 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी सुधारित आवृत्ती १५ ऑगस्ट २००८, पृ.१२, ३६
4) डॉ. वंदना महाजन, उनि, पृ. ३६
5) 'प्रा. प्रल्हाद लुलेकर गौरव ग्रंथ', 'संपादक, प्रा. नागनाथ कोतापल्ले' प्रा. दत्ता भगत, 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य', प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १४ एप्रिल २०१७, पृ. ३७६.
6) भीमराव वाघचौरे, 'नवं काटवन', 'सायन पब्लिकेशन' प्रथमावृत्ती, सप्टेंबर २०१५, पृ.३०
7) तत्रैव, पृ. १७८.
8) तत्रैव, पृ. २७१.
9) तत्रैव, पृ. ३२५.
10) तत्रैव, पृ. ३३५.
11) तत्रैव, पृ. ४२.
12) तत्रैव, पृ. ३२८.
13) तत्रैव, पृ. ३४९.
14) तत्रैव, पृ. ४५२.
15) प्रा.डॉ. वासुदेव पले; 'जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव', प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती १३ नोव्हेंबर २०१४, पृ. ४३०.